# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
ई-मेलः **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in


## जाहीर सूचना

१. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, उद्योग व कृषि, ( एमसीसीआयए), पुणे, यांनी, वाणिज्यिक इमारती/औद्योगिक संकुलांना मिश्र भाराकरिता एकाच पॉइंटला वीज पुरवठा करण्या संबंधीच्या, सन २००५ च्या प्रकरण क्र.२५ आणि ५३ मधील, आयोगाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २००६ च्या आदेशातील काही मुद्यांबाबत स्पष्टीकरण मिळण्याकरिता एक याचिका (प्रकरण क्र. २००७ चा ७५- एकाच पॉइंटमधून वीज पुरवठा) आयोगाकडे दाखल केली आहे.

२. वरील प्रकरणी दिनांक २० डिसेंबर, २००७ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी आयोगाने राज्यातील वितरण परवानाधारकांना कार्यकारी गट स्थापन करण्याचे निर्देश दिले. विद्युत दाब पातळी व करारांतर्गत मागणी याबाबत घालून दिलेली कृतीची मानके यांचे पालन करुन तसेच उच्च दाब वीज दर लागू करण्याकरिता आवश्यक असलेल्या बाबींना बाधा न आणता, वाणिज्यिक इमारतीमधील उच्च दाब ग्राहकांना एका समायिक रोहित्रा (ट्रान्सफॉर्मर) मधून विद्युत पुरवठा कसा करता येईल या बाबतच्या सूचना या कार्यकारी गटाने एका अहवालाद्वारे सादर कराव्यात, असेही निर्देश आयोगाने दिले.

३. त्यानुसार, बेस्ट, आरईएल, टीपीसी आणि महावितरण यांनी नामनिर्देशित केलेल्या प्रतिनिधींचा एक कार्यकारी गट स्थापन करण्यात आला. या कार्यकारी गटाने त्याचा प्रारुप अहवाल आयोगास सादर केला आहे.

४. या प्रकरणी उचित निर्णय घेणे आणि आदेश पारित करणे आयोगास शक्य व्हावे याकरिता, वर उल्लेखलेल्या कार्यकारी गटाच्या अहवालावर सर्व हितसंबंधीत/ग्राहक प्रतिनिधी आणि जनतेकडून त्यांचे अभिप्राय/सूचना **१८ जुलै, २००८** पर्यंत मागविण्यात येत आहेत. या तारखेनंतर आलेल्या अभिप्राय/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सही/-
(प्र. बा. पाटील)
सचिव, मविनिआ

मुंबई,
१९-६-२००८